
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2025
तरुण भारत

# राज्यपाल राधाकृष्णन भूषवणार अध्यक्षस्थान

- शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ १७ रोजी
- १६ रोजी ग्रंथ दिंडी, ग्रंथ महोत्सवाचे आयोजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार १७ रोजी होत आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलप्रती, राज्यपाल सु. पी. राधाकृष्णन हे समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. गुरुवार १६ रोजी ग्रंथ दिंडी व ग्रंथ महोत्सवाचे आयोजन केले आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून समारंभाची जय्यत तयारी सुरु आहे.



दीक्षांत समारंभाला शुक्रवारी सकाळी ११ वाजता सुरुवात होणार आहे. पुणे येथील सीएसएआर राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. आशीष लेले व उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे असून ते दीक्षांत भाषणातून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू दिगंबर शिंदे हे वार्षिक अहवालाचे वाचन करणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू प्रमोद पाटील, परिक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, गुरुवार १६ रोजी ८ वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथ दिंडीला प्रारंभ होणार आहे. कमला कॉलेज, जनता बाजार, राजारापुरी मेन रोड, शिवाजी विद्यापीठ रोड, आईचा पुतळा, सायबर चौक येथून शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब बहुउद्देशिय सभागृहात दिंडीचा समारोप होणार आहे. यानंतर सकाळी ११ वाजता याच ठिकाणी ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2025
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा शुक्रवारी दीक्षान्त समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ६१वा दीक्षान्त समारंभ येत्या शुक्रवारी (दि.१७) सकाळी ११ वाजता होणार आहे. पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. आशिष लेले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलपती तथा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन अध्यक्षस्थानी असतील. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या दीक्षान्त समारंभानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. दीक्षान्त समारंभानिमित्त दि. १६ जानेवारीला कमला कॉलेज येथून सकाळी ८ वाजता ग्रंथदिंडी निघेल. कमला कॉलेज, जनता बझार, राजारामपुरी मेनरोड, सायबर चौक यामार्गे ही दिंडी विद्यापीठात पोहोचेल. येथे १०.३० वाजता ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. या समारंभाला उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.

11 JAN 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निर्मितीक्षम वाचन पद्धतीचा वापर काळाची गरज

## डॉ. सुनीलकुमार लवटे; शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वाचन तुटले तर व्यक्ती सांस्कृतिकदृष्ट्या रोडावते. त्यामुळे वाचन व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक आहे. सध्या मुक्त संसाधन चळवळ म्हणजेच ओपन सोर्स मूव्हमेंट जगभरामध्ये सुरू आहे. निर्मितीक्षम वाचन पद्धतीचा वापर करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वाचन संकल्प महाराष्ट्राचा मोहिमेअंतर्गत आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. बी. बिलावर आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

विद्यापीठ बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा मोहिमेअंतर्गत डॉ. लवटे यांचे 'वाचनाची विस्तारित क्षितिजे' या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. डॉ. लवटे म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये व्यासंगामुळे वाचन वाढत जाते आणि वाचन प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव करते. विद्यार्थ्यांनी वाचन व्यवहार समजून घ्यावा.

वैचारिक वाचन साहित्याची गरज व्यक्तिमत्त्व विकासाकरिता आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी वाचनाचा परीघ वाढवून विश्वव्यापी ज्ञान मिळवण्याचे आवाहन त्यांनी केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात कौशल्य आधारित शिक्षण प्रणाली तसेच राष्ट्र विकासामध्ये तरुणांचे वाचनाद्वारे योगदानवर्धित करता येते, असे नमूद केले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे प्र-संचालक डॉ. डी. बी. सुतार यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी करून दिला. सुधाराणी हजारे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात यांनी केले. यावेळी डॉ. शरद बनसोडे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. युवराज जाधव आदी उपस्थित होते.

11 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षान्त समारंभानिमित्त गुरुवारी ग्रंथ दिंडी

## वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. आशिष लेले प्रमुख पाहुणे; शुक्रवारी मुख्य कार्यक्रम

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (ता. १७) सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. त्यासाठी राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. आशिष लेले, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे, तर अध्यक्षस्थानी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन असतील. या समारंभानिमित्त गुरुवारी (ता. १६) ग्रंथदिंडी, ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन



डॉ. आशिष लेले

होणार आहे. विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे आयोजित ग्रंथदिंडी गुरुवारी सकाळी आठ वाजता कमला कॉलेज येथून सुरू होईल. जनता बझार, राजारामपुरी मेन रोड, शिवाजी विद्यापीठ रोड, आईचा पुतळा, सायबर चौक मार्गे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात या दिंडीचा समारोप होणार आहे. त्यानंतर सकाळी साडेदहा वाजता बहुउद्देशीय सभागृहासमोरील जागेत ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होईल. दीक्षान्त समारंभ शुक्रवारी सकाळी अकरा वाजता बहुउद्देशीय सभागृहात होणार असून, त्यात विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे वाचन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के करतील. यावर्षीच्या सभारंभामध्ये सुमारे ५० हजार स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

### समारंभादिवशीच्या परीक्षा पुढे ढकलल्या

दीक्षान्त समारंभादिवशी शुक्रवारी होणाऱ्या विद्यापीठस्तरीय परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या सर्व परीक्षा १९ जानेवारी रोजी आयोजित केल्या असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2025
सकाळ



कोल्हापूरः स्पर्धेतील विजेत्यांसमवेत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अशोक रोकडे, डॉ. आसावरी जाधव, तृप्ती करेकट्टी.

# राष्ट्रीयस्तरावर हिंदीला पर्याय नाही : अशोक रोकडे

## विद्यापीठात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १० : 'आम्ही भारताचे लोक' या उक्तीप्रमाणे प्रत्येक नागरिकाने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेऊन देशासाठी निस्वार्थ सेवाभाव जपला पाहिजे. ज्यावेळी आपत्ती व्यवस्थापनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यात जावे लागते, त्यावेळी हिंदी भाषेचाच आधार घ्यावा लागतो. राष्ट्रीयस्तरावर हिंदीला पर्याय नाही', असे प्रतिपादन व्हाईट आर्मीचे संस्थापक अध्यक्ष अशोक रोकडे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे हिंदी व पर्यावरणशास्त्र अधिविभाग, शिव सहाय्यता व आपत्ती व्यवस्थापन केंद्र आणि युको बँक यांच्यातर्फे जागतिक हिंदी दिनानिमित्त निलांबरी सभागृहात आयोजित व्याख्यानमाला आणि आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

या कार्यक्रमात आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे समन्वय डॉ. एस. एम. गायकवाड, राजभाषा अधिकारी अमरदीप कुलश्रेष्ठ यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शाखा अधिकारी विशाल गीते, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, संतोष कोळेकर, पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव आदी उपस्थित होते. गीता दोडमणी, अक्षय भोसले यांनी सूत्रसंचालन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. पल्लवी कुलकर्णी, प्रदीप भिंगार्डे, विनायक माळी यांनी आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. आग सुरक्षा अधिकारी दस्तगीर मुल्ला यांनी प्रात्यक्षिक दाखविले. विद्यापीठाच्या शिववाणीवरून हिंदी दिवसाचे महत्त्व सांगणारा कार्यक्रम प्रसारित करण्यात आला. त्यात वारणा महाविद्यालयाचे डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, अधिसभा सदस्य अभिषेक मिठारी, डॉ. पल्लवी भोसले, प्रा. अनिल मकर, डॉ. रचना इंगवले, सुषमा चौगले, सुवर्णा गावडे, डॉ. प्रकाश मुंज आदी सहभागी झाले.

### विद्यार्थ्यांचा गौरव

या कार्यक्रमात अश्विनी पाटील, सिद्धेश्वर माळी यांना राजभाषा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. निबंध स्पर्धेतील विजेत्यांना वैष्णवी कांबळे, इरम खान, जान्हवी ओंबळे, वैष्णवी चव्हाण, मोहम्मद अत्तार (पदवीस्तर), अविनाश कांबळे, श्रीकांत देसाई, गुलामगौस तांबोळी, आदित्य सोनवणे, बन्सी होवाळे (पदव्युत्तर) यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

11 JAN 2025 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचनातून होणारी बौद्धिक समृद्धी महत्त्वाची : डॉ. लवटे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वैचारिक वाचन साहित्याची गरज व्यक्तिमत्त्व विकासाकरिता आवश्यक आहे. वाचनातून होणारी बौद्धिक समृद्धी महत्त्वाची, तसेच वाचनामुळे सांस्कृतिक श्रेष्ठता वाढीस लागते, असे प्रतिपादन डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे आयोजित करण्यात आलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या मोहिमेंतर्गत त्यांचे 'वाचनाची विस्तारित क्षितिजे' या विषयावर राजर्षी शाहू सभागृहामध्ये व्याख्यान झाले.



कोल्हापूर : 'वाचनाची विस्तारित क्षितिजे' या विषयावर बोलताना डॉ. सुनीलकुमार लवटे.

डॉ. लवटे म्हणाले, विद्यार्थ्यांत व्यासंगामुळे वाचन वाढत जाते आणि वाचन प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव करते. विद्यार्थ्यांनी वाचन व्यवहार समजून घ्यावा. ग्रंथवाचनासोबत विद्यार्थ्यांनी सभोवतालचा निसर्ग, जंगल, व्यक्ती इ. सर्व गोष्टींचे वाचन करणे आवश्यक आहे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये कौशल्य आधारित शिक्षण प्रणाली, तसेच राष्ट्र विकासामध्ये तरुणांचे वाचनाद्वारे योगदान वर्धित करता येते, असे नमूद केले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्र-संचालक डॉ. डी. बी. सुतार यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी केला.

सूत्रसंचालन सुधाराणी हजारे यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात यांनी केले. डॉ. शरद बनसोडे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. युवराज जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2025
सकाळ

# लेखक अरविंद देशपांडे यांनी विद्यापीठात साधला संवाद

कोल्हापूर, ता. १० : 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागातर्फे मंगळवारी 'लेखक व विद्यार्थी वाचन संवाद' हा कार्यक्रम झाला. त्यात सांगलीतील विस्तार सेवा केंद्राचे माजी समन्वयक आणि लेखक अरविंद देशपांडे यांची प्रकट मुलाखत अधिविभाग प्रमुख डॉ. एस. बी. पाटील यांनी घेतली.

मुलाखती दरम्यान देशपांडे यांनी समन्वयक, शिक्षक व नरेंद्र विद्यापीठाचे संस्थापक संचालक म्हणून राबवलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती श्रोत्यांना दिली.

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. डी. बी. सुतार यांनी 'ग्रंथपरीक्षण कसे करावे' याबाबत मार्गदर्शन केले. या केंद्राचे उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, वरिष्ठ ग्रंथालय सहायक डॉ. धनंजय गुरव, डॉ. आर. डी. खामकर, आदी उपस्थित होते. वक्त्यांना परिचय सहयोगी प्राध्यापक डॉ. वाय. जी. जाधव यांनी करून दिला. सहायक प्राध्यापक विनोद गुरव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2025
सकाळ



कोल्हापूर : आंतरविभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेत विजेत्या संघासोबत कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

# आंतरविभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास सुवर्णपदक

कोल्हापूर, ता. १० : कराड येथील वेणूताई चव्हाण कॉलेजमध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत विद्यापीठाच्या यूजी आणि पीजी विभागाने विजेतेपद पटकाविले.

संघात स्वप्नाली वायदंडे, धनश्री कांबळे, सदिया पटेल, तब्बसूम छडेदर, अपूर्वा पाटील, तनुजा कदम, ऐश्वर्या पुरी, पौर्णिमा हिटमुडे, करिष्मा कुडचे, पल्लबी कांबळे, प्रियांका अंची, निशा आवळे यांचा समावेश होता. संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2025
पुढारी

# विद्यापीठाकडून २८२ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर - नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर २८२ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. शुक्रवारी बीए, बीएस्सी., बीबीए, बीटेक, एमबीए, एमजे, एमटेक, आदी ३० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १७९ केंद्रांवर सुरळीतपणे झाल्या. परीक्षेला ३८ हजार ८७२ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, दि. १० रोजी एलएलएम, बीबीए, एमए (रशियन), एमसीए (ब्रीज कोर्स) आठ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. परीक्षेत भरारी पथकाकडून कोल्हापूर एक व सातारा ८ अशा नऊ गैरप्रकाराची नोंद केल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षेला ४०,३३३ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला ४० हजार ३३३ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात गुरुवारी बीए, बीएस्सी, बीबीए, एमबीए, एमजे आदी १७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १७४ केंद्रांवर झाल्या. दि. ९ रोजी बीएफए, बीआयडी या तीन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. आजअखेर २७४ परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत. भरारी पथकाकडून कोल्हापूर १ व सांगली १ अशा दोन गैरप्रकाराची नोंद झाली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

**१७ जानेवारीच्या सर्व परीक्षा १९ जानेवारीला**

विद्यापीठाचा ६१ वा पदवी प्रदान समारंभ शुक्रवारी (दि. १७) आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे या दिवशी विद्यापीठ स्तरावर नियोजित सर्व परीक्षा दि. १९ रोजी घेण्यात येणार असल्याचे विद्यापीठ परीक्षा विभागाने कळविले आहे.

11 JAN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचन ते वाचनसंस्कृती !

**'संकल्प महाराष्ट्राचा' याअंतर्गत वाचन उपक्रम एक जानेवारीपासून सुरू झाला असून तो १५ जानेवारीपर्यंत हा उपक्रम राबवला जाणार आहे. ग्रंथ प्रदर्शन, वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळण्यासाठी व्याख्यान, विद्यार्थ्यांचा लेखकाशी संवाद, सामूहिक वाचन उपक्रम, पुस्तक परिचय-परीक्षण स्पर्धा, वाचन कौशल्य कार्यशाळा, ग्रंथकथन अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे.**

**-डॉ. व्ही. एन. शिंदे**

मोबाईल आणि समाजमाध्यमांमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तकाकडे वळवण्यासाठी एक-दोन दिवसाचे नव्हे तर संपूर्ण पंधरवड्याचे नियोजन करण्यात आले आहे. ज्यांनी अजून अभ्यासक्रमबाह्य वाचनाच्या क्षेत्रात पहिले पाऊलही टाकलेले नाही, त्यांना पुस्तक वाचनाचा आनंद काय असतो, पुस्तक वाचन म्हणजे नेमके काय, हे कळण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. या उपक्रमाचे अंतिम उद्दिष्ट हे वाचनसंस्कृती निर्माण व्हावी, वाढावी हा आहे. यामध्ये विशेष म्हणजे राज्यातील सर्व शासकीय ग्रंथालयांचाही सहभाग असणार आहे. या उपक्रमामध्ये अनेक विद्यार्थी प्रथमच अवांतर वाचन कौशल्याकडे जाणार आहेत. काही विद्यार्थ्यांकडे हे कौशल्य पूर्वीपासूनच असणार आहे. बरेचसे विद्यार्थी केवळ ऑनलाईन येणारे बरेचसे टुकार साहित्य वाचणारे असणार आहेत. या सर्वांना एकत्र आणण्याचे, काहीजणांसाठी अनिच्छेने असले, तरीही या उपक्रमात सहभागी होण्याचे कार्य या उपक्रमातून साध्य होणार आहे. वाचनाचे महत्त्व सांगणारी व्याख्याने काही विद्यार्थ्यांवर निश्चितच वाचन संस्कार करणार आहेत. म्हणूनच मोबाईल युगात हा अभिनव उपक्रम महत्त्वाचा ठरतो. मनापासून वाचणारी मंडळी निश्चितच वाचन संस्कृतीपर्यंत पोहोचणार यात शंका नाही. वेळ किती लागणार हे त्या वाचकाच्या वाचन गतीवर आणि शास्त्रशुद्धतेवर अवलंबून असणार आहे. वाचन मूलतः मानवाला ज्ञानसंपन्न बनवते. ज्ञानसंपन्न व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आपोआपच चारचौघांत उठून दिसते. नव्याने वाचनप्रवाहात येणाऱ्या वाचकांनी हे लक्षात घेण्याची गरज आहे की, वाचन हे व्यक्तिमत्त्व विकास व्हाया वाचनसंस्कृती या प्रवासातील वाचन हा पहिला टप्पा आहे.

या प्रवाहात येऊ इच्छिणाऱ्यांचा काय वाचावे, असा प्रश्न असतो, वाचणार कधी? आपल्याकडे वाचनासाठी बिलकूल वेळ नाही, असे अनेकांचे मत असते. वेळ नाही ही तक्रार अत्यंत चुकीची आहे. सर्वांकडे केवळ दिवसाचे २४ तासच असतात. या २४ तासांत आपण काय करतो, याचा हिशेब आपणच मांडायला हवा. दिवसभर आपण किती वेळ वाया घालवतो, हे आपोआपच लक्षात येते. त्याचप्रमाणे आपली कोणाशी तरी बैठक ठरलेली असते. आपण वेळेवर जातो, मात्र समोरची व्यक्ती वेळेवर येत नाही. हा प्रतीक्षा कालावधी तर खूप त्रास देणारा असतो. मात्र



अशा वेळी जर आपल्याबरोबर एखादे पुस्तक असेल तर आपला वेळ निश्चितच चांगला जातो. आपली चिडचिड होत नाही. त्यामुळे वेळ नाही ही सबब योग्य नाही. मात्र वाचनाची सुरुवात करताना आपल्या आवडीच्या विषयाच्या हलक्या पुस्तकांनी करावी. पुढे आपले वाचन जसे समृद्ध होत जाते, तसे आपले हात इतर विषयांकडे या विषयातील अभिजात पुस्तकांकडे आपोआप जायला सुरुवात होते.

वाचन करायचे तर पुस्तक वाचायचे. मात्र कोणते पुस्तक वाचावे, असा प्रश्न अनेक वाचक विचारतात. काय वाचावे, असाही काहींचा प्रश्न असतो. खरे सांगायचे तर जे मिळेल ते वाचावे. त्यातून आपण वाचनासाठी पुस्तक निवडताना पुस्तकाची प्रस्तावना आणि ब्लर्ब किंवा पाठराखण वाचून ठरवता येते. पुस्तकाचे वाचन करताना आपण त्या भूमिकेत शिरून पुस्तक वाचायला हवे. पुस्तकाचे वाचन मन एकाग्र करून वाचन करण्याची गरज असते. आपण वाचन केलेले पुस्तकातील विचार आपल्या मेंदूपर्यंत पोहोचले पाहिजेत. पुस्तकातील चांगले विचार, अनुभव हे आपण निवडायला हवेत. मेंदू हा आपल्यासाठी वरदान आहे. याचा वापर करूनच आपण इतर प्राण्यांपेक्षा वेगळे ठरलो आहोत. आपल्याला संगणकाची, मोबाईलची मेमरी किती आहे, हे माहीत असते. मात्र आपल्याच मेंदूची मेमरी किती आहे, हे अनेकांना माहीत नसते. मानवी मेंदू साधारण १३०० ते १४०० ग्रॅम वजनाचा असतो. त्याची स्मृती क्षमता किंवा साठवण क्षमता २५ लक्ष गिगाबाईट इतकी आहे. आजमितीला कोणाकडेही एवढी मेमरी असणारा संगणक किंवा मोबाईल असणे शक्य नाही. असे असतानाही आपण त्याचा वापर अत्यल्प करतो. आपण जर त्याचा वापर कमी करत गेलो, तर डार्विनच्या सिद्धांतानुसार भविष्यात मानवी मेंदू आकाराने घटत जाईल. त्यामुळे त्याचा वापर आपण जास्तीत जास्त केला पाहिजे. विशेष म्हणजे आपल्या शरीराने तयार केलेल्या ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर हा मेंदूच करत असतो. त्यामुळे आपण वाचलेल्या पुस्तकातील चांगले विचार, अनुभव आपण येथे साठवायला हवेत. असे आपण लाखो पुस्तकांतील चांगले विचार, अनुभव आपल्या मेंदूमध्ये साठवू शकतो. आपल्या मेंदूचा केवळ सहा ते सात टक्के भाग वापरला जातो. सर्वाधिक दहा टक्के मेंदू वापरला जातो, असे वैद्यकशास्त्र सांगते. त्यामुळे वाचताना वेचलेले या मेंदूमध्ये साठवायला हवे.वाचताना वेचलेले आणि मेंदूत साठवलेले मोकळ्या वेळात आठवायला हवे. जे काही साठवलेले आठवते, त्यावर आपल्या मेंदूमध्ये विचार करायला हवा. हा विचार सर्व बाजूंनी करायला हवा. यातून आपण ज्या व्यक्तीबाबत, घटनेबाबत वाचलेले, साठवलेले आता आठवत असते, त्या व्यक्तीला घटनेला समजून घेण्यासाठी खूप उपयुक्त आणि गरजेचे असते.